**प्रेसनोट** **दिनांक – २९/०२/२०२४**

**पिंपरी चिंचवड पोलीसांची संघटीत गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्यासाठी यादव टोळीवर "मोका अंतर्गत कारवाई "**

आगामी लोकसभा निवडणुकांचे पार्श्वभुमीवर मा.पोलीस आयुक्त, श्री.विनय कुमार चौबे, यांनी आगामी लोकसभा निवडणुक हया भयमुक्त व पारदर्शक व निःपक्षपातीपणे पार पाडता याव्यात यासाठी व्यापक प्रतिबंध कारवाईचा आराखडा तयार केला असुन त्या अंतर्गत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरिराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **मा.पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२४ मध्ये आजपावेतो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील ०४ संघटीत गुन्हेगारी टोळयांमधील एकुण २४ आरोपींवर मोका कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.**

**१) चिखली पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ७०६/२०२३ भादवि. ३०२, ३०७, ३२६, ३२३, ३६४, १४३, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६, आर्म ॲक्ट ४,(२५),५,२७,३५, महा.पो.का.कलम ३७(१)(३) १३५ या** गुन्हयांचे तपासामध्ये आरोपी नामे, **(१) राहुल प्रल्हाद यादव, (टोळी प्रमुख)** वय ३२ वर्षे, रा.गट नं. ८५०, विठ्ठल रुक्मीणी मंदीराचे शेजारी, कुदळवाडी, चिखली, पुणे **२) नागेश गुलचंद सुर्यवंशी,** वय २८ वर्षे, रा. सोळु प्राथमीक शाळेजवळ, ता. खेड, जि.पुणे **३) रोहन भानुदास यादव,** वय २१ वर्षे, रा. चंद्रभागा गौशाळा जवळ, सोनवणे वस्तीजवळ,रामदास नगर, चिखली पुणे **४) आशिष भिमराव बजलव**, वय २७ वर्षे, रा. रॉयल प्लाजा, तिसरा मजला, फ्लॅट नं. ३०३, इंद्रायणी वजन काट्याचे शेजारी, कुदळवाडी, चिखली, पुणे **५) राजेश बहरीच निसाद**, वय ३२ वर्षे, रा. प्रथमेश पार्क सोसायटी, फ्लॅट नं. १०१, पहिला मजला, बालघरे यांचे एच.पी.पेट्रोल पंपचे समोर, कुदळवाडी, चिखली, पुणे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण ०७ गुन्हे** केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.

वरील **टोळी प्रमुख** याने त्याचे साथीदारांसह अन्य सदस्यांसाठी प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळवण्याचे उद्देशाने स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी संघटित गुन्हेगारी संघटनेचा प्रमुख म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करुन अथवा हिंसाचाराची धमकी देवुन किंवा धाक दपटशहा दाखवुन टोळी प्रमुख व साथीदार यांनी **चिखली, आळंदी,** पोलीस स्टेशन हद्दीत **खुन, खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, दंगा, मारामारी, बेकायदेशीर जिवघेणी हत्यार जवळ बाळगणे** अशा प्रकारेचे गंभीरे स्वरुपाचे चढत्या क्रमाने गुन्हे दाखल आहेत. प्रत्येक गुन्हा करताना त्यांनी वैयक्तिक व टोळीचे वर्चस्व वाढावे व आर्थिक फायदा व्हावा तसेच जनमानसात दहशत रहावी हाच उद्देश ठेवुन टोळी प्रमुखाने गुन्हे केलेले आहेत.

सदर टोळीमधील सर्व आरोपी यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवुन हिंसाचाराचा वापर करुन वर्चस्वासाठी व आर्थिक फायदयासाठी संघटीतपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अतंर्गत कारवाई करणे बाबत प्रस्ताव पोलीस आयुक्त कार्यालय येथे सादर केला असता सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करुन नमुद गुन्ह्यांत **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३ (४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश मा. श्री.वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड** यांनी पारीत केलेले आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा.अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, मा.पोलीस उप-आयुक्त श्री.संदिप डोईफोडे (गुन्हे), मा.पोलीस उप-आयुक्त श्री.शिवाजी पवार (परि-३), मा.सहा.पोलीस आयुक्त श्री.विवेक मुगळीकर (गुन्हे -१), मा.सहा.पोलीस आयुक्त श्री.राजेंद्रसिंह गौर (भोसरी एमआयडीसी विभाग), यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर काटकर, चिखली पोलीस ठाणे, सपोनि निता उबाळे, सपोनि वर्षा जगदाळे, पीसीबी गुन्हे शाखा, तसेच अंमलदार पो.हवा. सचिन चव्हाण, पो.हवा. व्यंकप्पा कारभारी, पी.सी.बी. गुन्हे शाखा, मपोहवा केदार (चिखली पो.स्टे), यांच्या पथकाने केली आहे.

**(सतिश माने )**
जनसंपर्क अधिकारी
पिंपरी चिंचवड आयुक्तालय